# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः27.08.2024** **वारःमंगळवार**

---

1. आदिवासी पाड्यांचं आदर्श गावांमध्ये रुपांतर करण्याचं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचं आवाहन
2. राज्यभरातल्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी पॅनिक बटण बसवणार असल्याची शिक्षणमंत्र्यांची माहिती
3. गोकुळाष्टमीचा उत्सव राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा; आज रंगणार दहीहंडीचा थरार
4. राज्याच्या विविध भागात कालही पावसाची हजेरी; अनेक जिल्ह्यात शेतपिकांचं नुकसान आणि
5. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, खासदार वसंतराव चव्हाण यांचं निधन; आज नांदेडमध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार.

**राज्यपाल**

आदिवासी बांधवांना पायाभूत सुविधा आणि उत्तम सेवा देऊन आदिवासी पाड्यांचं आदर्श गावांमध्ये रुपांतर करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत,असं आवाहन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. 'आदर्श आदिवासी गाव' ही कल्पना देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आदर्श आदिवासी गावं तयार करणं तसंच आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याच्या दृष्टीनं विचार विनिमय करण्यासाठी राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली काल राजभवनात बैठक झाली; त्यावेळी ते बोलत होते. प्रधानमंत्री जनमन योजनेच्या राज्यातील अंमलबजावणीचा आढावाही यावेळी राज्यपालांनी घेतला.

**राष्ट्रीयई-गव्हर्नन्स**

27 वी राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स परिषद येत्या 3 आणि 4 सप्टेंबर रोजी मुंबईत होणार आहे. या परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र राज्याकडे असून 'विकसित भारतः सुरक्षित आणि शाश्वत ई-सेवा पुरविणे' हा या परिषदेचा विषय आहे. परिषदेचं उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार असून केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यावेळी उपस्थित राहणार आहेत.

**मुख्यमंत्री-शिवराय-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण-राजकोट इथं छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा पुन्हा एकदा उभारू, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. सोसाट्याचा वारा आणि वादळामुळे हा पुतळा कोसळला, मात्र लवकरच अधिक भक्कम पुतळा उभारू, असं त्यांनी काल सांगितलं. या विषयावर विरोधकांनी राजकारण करू नये, तसंच कुणीही कायदा हातात घेऊ नये असंही मुख्यमंत्री म्हणाले.

दरम्यान या प्रकरणी पुतळ्याचे शिल्पकार, सल्लागार आणि ठेकेदार यांच्यावर गुन्हे दाखल करण्याच्या सूचना जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिल्या आहेत. चव्हाण यांनी काल राजकोट इथं जाऊन घटनास्थळाची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. या प्रकरणाची नौदलानंही दखल घेतली असून या घटनेच्या तपासासाठी आणि लवकरात लवकर पुतळा पुनर्स्थापित करण्याच्या दृष्टीनं राज्य सरकार आणि संबंधित तज्ज्ञांचं एक पथक नियुक्त केलं आहे.

**राज्यसभा-मुंबई**

राज्यसभेच्या राज्यातील दोन रिक्त जागांवर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नितिन पाटील आणि भाजपाचे धैर्यशील पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याची माहिती विधीमंडळाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. केंद्रिय वाणिज्य मंत्री पियुष गोयल आणि खासदार उदयनराजे भोसले लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्याने महाराष्ट्रातील राज्यसभेच्या दोन जागा रिक्त झाल्या होत्या.

**समारोप-बीड**

बीड जिल्ह्यातल्या परळी वैजनाथ इथल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचा काल समारोप झाला. गेल्या सहा दिवसात या कृषी प्रदर्शनाला साडेचार लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी भेट दिली. या महोत्सवातील विविध दालनांच्या माध्यमातून सुमारे तीन कोटीं रुपयांपेक्षा अधिक आर्थिक उलाढाल झाल्याचं बीड जिल्हा कृषी अधीक्षकांनी सांगितलं.

**पॅनिक बटण-मुंबई**

राज्यभरातल्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी पॅनिक बटणं बसवण्याचा उपक्रम राबवला जाणार आहे. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी काल मुंबईत बातमीदारांना ही माहिती दिली. शाळांमध्ये तक्रारपेट्या बसवण्याचं काम तातडीनं पूर्ण करणार असून पोलिसांच्या उपस्थितीत या पेट्या उघडण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं नुकताच घेतल्याचं त्यांनी सांगितलं. दरम्यान, बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातल्या आरोपीची रवानगी 14 दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे.

**विमानतळ**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाला जगद्‌गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचं नाव देण्यासाठी, राज्य शासनाने प्रस्ताव तयार करून केंद्र सरकारकडे पाठवावा, असं केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी म्हटलं आहे. या संदर्भात मोहोळ यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

**गोकुळाष्टमी**

श्रीकृष्ण जन्माचा म्हणजेच गोकुळाष्टमीचा उत्सव काल मध्यरात्री सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. राज्यातील सर्वच लहानमोठ्या श्रीकृष्ण मंदिरांमध्ये, तसंच घरोघरी पारंपरिक पद्धतीनं कृष्ण जन्माचा सोहळा साजरा करण्यात आला. कृष्णाष्टमी निमित्त ठिकठिकाणच्या कृष्ण मंदिरांना आकर्षक रोषणाई आणि फुलांची

करण्यात आली आहे. आज सर्वत्र दहिकाल्याचा उत्साह असेल; पुण्या-मुंबईसह संपूर्ण राज्यात आज दहीहंडीचा थरार रंगणार आहे.

<u>**आयआयटीएम**</u>

2026पर्यंत एकाच वेळी अवकाशात गगनयान आणि समुद्रात समुद्रयान सोडण्याच्या दृष्टीने नियोजन आहे, अशी माहिती भूविज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन यांनी काल पुण्यात दिली. भारतीय समशीतोष्ण हवामान संस्थेत आयोजित एका प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. हवामानाचा आणखी अचूक अंदाज वर्तवता येण्याच्या दृष्टीनं डिजिटल सॉफ्टवेअर प्रणाली विकसित करण्याकडे लक्ष्य केंद्रित केलं असल्याचं त्यांनी सांगितलं. भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्यूंजय महापात्र यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

<u>**पुणे पूर**</u>

गेल्या महिनाभरात किमान 3 वेळा पुण्यात पूरपरिस्थिती निर्माण झाली आणि मोठी वित्तहानी झाली. या पूर परिस्थितीला महापालिका प्रशासनाबरोबरच इतरही घटक जबाबदार असल्याचं निरीक्षण जलसंपदा विभागाचे निवृत्त सचिव व्ही. डी. कुलकर्णी यांनी आकाशवाणीशी बोलताना नोंदवलं आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पूर परिस्थिती नियंत्रणासंदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या वडनेरे समितीचे सदस्य म्हणूनही कुलकर्णी यांनी काम पाहिलं असल्यानं त्यांचा हा निष्कर्ष महत्वपूर्ण मानला जात आहे. ऐकू या त्यांच्या मुलाखतीवर आधारित वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून.......

**गेल्या महिनाभरात किमान 3 वेळा पुणेकरांनी अनुभव घेतलेल्या पूर परिस्थितीला नेमकं जबाबदार कोण यावरून सध्या आरोप प्रत्यारोप सुरु आहेत. मात्र गेल्या 30 वर्षांच्या कालावधीत पुण्यातील दोन्ही नद्यांची पाणी वाहून नेण्याची क्षमता 50 टक्क्यांनी कमी झाली असून त्यामुळंच वारंवार पूर परिस्थिती निर्माण होत असल्याचा निष्कर्ष जलसंपदा विभागाच्या तज्ज्ञांनी नोंदवला आहे. नदी पात्रातील विविध प्रकारची अतिक्रमण, टाकला जाणारा राडारोडा, त्याचबरोबर पूर रेषेच्या आत होणारी बांधकामं आणि नदीवर काही ठिकाणी अशास्त्रीय पद्धतीनं उभारले गेलेले आणि आता निरुपयोगी ठरलेले जुने पूल यामुळंच नदी पात्राची वहन क्षमता कमी झाली आहे, पूर्वी 1 लाख क्युसेक्स पाणी धरणातून सोडल्यानंतर देखील नदीला पूर येत नव्हता आणि आज त्याच्या निम्मे म्हणजे 45 ते 50 हजार क्युसेक्स पाणी सोडलं तरी पूर परिस्थिती निर्माण होत असल्याचं परखड मत त्यांनी नोंदवलं आहे. याबद्दलचे शास्त्रीय पुरावे देखील त्यांच्याजवळ उपलब्ध आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून विनायक सोमणी.**

<u>**बंदमागे-नवीमुंबई**</u>

आपल्या विविध मागण्यांसाठी राज्यभरातील व्यापाऱ्यांनी आज पुकारलेला बंद मागे घेण्यात आला आहे. व्यापारी संघटनेच्या प्रतिनिधींची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर काल मुंबईत बैठक झाली; यावेळी झालेल्या सकारात्मक, समाधानकारक चर्चेनंतर व्यापारी कृती समितीने पुकारलेला महाराष्ट्र व्यापार बंद मागे घेतला आहे.

**<u>अत्याचार-रत्नागिरी</u>**

रत्नागिरीमध्ये काल एका प्रशिक्षणार्थी परिचारिकेवर अत्याचाराचं प्रकरण समोर आलं, या प्रकरणी संशयित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकारामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी काल जिल्हा शासकीय रुग्णालयात गर्दी केली होती; तसंच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिचारिकांनी काही काळ काम बंद केलं होतं.

**<u>निधन-नांदेड</u>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार वसंत चव्हाण यांचं काल निधन झालं. ते 70 वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर हैद्राबादमधल्या रुग्णालयात उपचार सुरू होते. आज सकाळी नांदेड जिल्ह्यातल्या नायगाव इथं त्यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. सरपंच, विधानपरिषद, विधानसभेचे सदस्य ते लोकसभेचे खासदार असा त्यांचा राजकीय प्रवास आहे. शिक्षण, सहकार आणि कृषी क्षेत्रात त्यांनी महत्वाचं योगदान दिलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि भाजपा खासदार अशोक चव्हाण यांनी वसंतराव चव्हाण यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<u>पाऊस</u>**

राज्यात विविध ठिकाणी कालही पावसानं जोरदार हजेरी लावली. विविध जिल्ह्यातील धरणांच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. नंदुरबार जिल्ह्यात तीन जण पुराच्या पाण्यात वाहून गेले. मुसळधार पावसाने जिल्ह्यातल्या शेतीचं आणि पिकांचं मोठं नुकसान झाल्याने शेतकरी चिंतेत आहे. धुळे जिल्ह्यातही काल पावसाचा जोर कायम होता; शहरातुन वाहणाऱ्या पांजरा नदीला आलेल्या पुरामुळे धुळे शहरातील शाळांना आज सुटी जाहीर करण्यात आली आहे. बीडमध्ये गेल्या काही दिवसांत झालेल्या पावसाने शेतीचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण गावातील सर्व शेती पाण्याखाली गेली असून उडीद, कापूस, सोयाबीन, मूग, बाजरी, तूर, आणि कांदा पीक वाया गेल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. पुणे, सांगली आणि सातारा जिल्ह्यातही पावसाचा जोर कायम आहे. नाशिक जिल्ह्यातल्या सुरगाणा, पेठ, त्र्यंबक या तालुक्यांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली असून ग्रामीण भागात अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली आहे. तसंच अनेक तालुक्यांमध्ये पिकांचं नुकसान झालं आहे. रत्नागिरी जिल्ह्यातल्या अणुस्कुरा घाटात गेल्या शनिवारी कोसळलेली दरड हटवण्याचं काम काल पूर्ण झालं; त्यानंतर या घाटातून एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यात येत्या 24 तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातही काही ठिकाणी पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.